# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.03.2025** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

- रंगांचा उत्सव होळीचा देशात उत्साह
- मुंबईत होणाऱ्या वेव्हज परिषदेच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत जागतिक समुदायासाठी एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन
- छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात सतरा नक्षलवादयांची शरणागती
- जागतिक पॅरा-ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये भारत 134 पदकांसह अव्वल स्थानी आणि,
- विदर्भासह पश्चिम भारतात आज उष्णतेच्या लाटेचा इशारा

**होळी**

रंगांचा सण होळी देशभरात पारंपरिक उत्साह आणि आनंदानं साजरा केला जात आहे. वसंत ऋतूच्या आगमनाचं प्रतीक असलेला हा सण वाईटावर चांगल्याचा विजय अधोरेखित करतो. त्याचबरोबर एकता आणि सौहार्दाची भावना जोपासतो. या उत्सवाची सुरुवात कालच्या होलिका दहनानं झाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी होळीनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे की “हा सण आनंद आणि उत्साह घेऊन येतो.” उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही देशभरातील नागरिकांना शुभेच्छा देताना म्हणाले की, “हा सण म्हणजे नवीन दृष्टिकोनाचं प्रतीक आहे”. देशवासीयांमध्ये एकतेचे रंग बळकट करताना प्रत्येकाच्या जीवनात नवीन उत्साह आणि ऊर्जा आणेल या शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना समाज माध्यमांद्वारे होळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**जम्मू-काश्मीर**

जम्मू - काश्मीर आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशांमध्ये पुनर्रचनेनंतर मालमत्ता, दायित्वे आणि अर्थसंकल्पाचं पारदर्शक वितरण करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काल जम्मू काश्मीर विधानसभेत दिली. या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना अब्दुल्ला बोलत होते. ही प्रक्रिया 30 ऑक्टोबर 2020 च्या अधिसूचनेनुसार केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. समितीच्या बहुतेक शिफारशी आधीच लागू करण्यात आल्या असून सार्वजनिक कर्जाच्या वाटणीबाबत 2 हजार 504 कोटी रुपयांचं आर्थिक दायित्व लडाख या केंद्रशासित प्रदेशाकडे हस्तांतरित केलं जाणार आहे. हा विषय गृह मंत्रालय आणि लडाख प्रशासनासमोर उपस्थित करण्यात आला असल्याची माहिती ओमर अब्दुल्ला यांनी दिली आहे.

**पंजाब - अर्थसंकल्प**
पंजाबचा 2025-26 या वर्षाचा अर्थसंकल्प 26 मार्च रोजी पंजाब विधीमंडळात मांडण्यात येणार आहे. विधीमंडळाचं विशेष अधिवेशन 21 ते 28 मार्च या कालावधीत होणार असून अर्थसंकल्प 26 मार्च रोजी सादर केला जाईल, असं पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी काल सांगितलं.

**मेघवाल - पुददूचेरी**
राष्ट्रीय शिक्षण धोरणात राज्यांच्या भाषांना प्रोत्साहन देण्याच्या राज्यघटनेच्या परिशिष्ठ आठ मध्ये असलेल्या तरतूदींचा समावेश असल्याचा पुनरुच्चार केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल काल पुददूचेरीमध्ये केला. अभिजात भाषा म्हणून तमिळ भाषेला प्रोत्साहन दिलं जाईल;
तसंच इतर भाषांचाही यामध्ये  समावेश करण्यात आला आहे, असंही त्यांनी अधोरेखित केलं.

**वेव्ज**
अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि परंपरा यांच्या एकत्रीकरणातून, भारत, आशय निर्मितीच्या क्षेत्रात क्रांती घडवत असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल सांगितलं. मुंबईत येत्या मे महिन्यात होणाऱ्या वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडियो व्हिज्यूअल ॲण्ड एंटरटेनमेंट परिषदेच्या पार्श्वभूमीवर काल नवी दिल्लीत जागतिक समुदायासाठी एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात ते बोलत होते. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. यावेळी केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात 'वेव्हज 2025' निमित्त सामंजस्य करार झाला.
विविध प्रकारची आशय निर्मिती करणाऱ्यांसाठी एक अब्ज डॉलरचा निधी उभारण्याची घोषणा अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केली. तसंच आयआयटी, आयआयएमच्या धर्तीवर भारतीय आशय तंत्रज्ञान संस्था; Indian Institute of Creative Technology ची स्थापना केली जाईल आणि याची पहिली शाखा मुंबईत सुरू करण्यात येईल अशी घोषणा वैष्णव यांनी केली. ते म्हणाले... . . . .
**क्रिएटर इकोनोमी के लिये 1 बिलियन डॉलर का फंड क्रिएट किया जायेगा , जो के ये इस वेव्हज को आगे ले जाने के लिये हो.**

जागतिक स्तरावर होणा-या या पहिल्या परिषदेचं यजमानपद महाराष्ट्राला मिळालं,  ही अभिमानाची बाब असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. वेव्ज परिषदेसाठी मुंबई सज्ज असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. ते म्हणाले,
**ओर ये जो दुनिया का सबसे बडा व्यासपीठ तयार हो रहा है हम तो ये निवेदन भारत सरकार से करणे वाले है , के ये व्यासपीठ आनेवाले दिनो में प्रॉपर्टी के रूप में हमेशा मुंबई में ही आयोजित कि  जाये . में महाराष्ट्र सरकार की ओर से भारत सरकार को ये आश्वस्त करता हुं के इस की सफलता में हम कोई कसर नाही छोडेंगे एक ग्लोबल ब्रांड तयार हो रहा है जिसका देश को ओर मुंबई को बहोत फायदा होगा .**

या कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना अधिक माहिती दिली. आयआयसीटी ही संस्था मुंबईच्या गोरेगाव चित्रनगरीमध्ये उभारण्यात येईल असं ते म्हणाले.

**नक्षलवादी**
छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात काल सतरा नक्षलवादयांनी शरणागती पत्करली. त्यापैकी नऊ जणांवर २४ लाख रुपयांचे रोख बक्षीस होतं. पोकळ आदर्शवाद, वरिष्ठ नक्षलवाकडून होत असलेलं निष्पाप आदिवासींचं शोषण आणि सुरक्षा दलांच्या वाढत्या प्रभावामुळे हे नक्षलवादी शरण आले असल्याचं वरिष्ठ पोलिस अधीक्षक जितेंद्र कुमार यादव यांनी सांगितलं.

**पानिपत**
पानिपत इथं राज्य शासनाच्या वतीनं मराठा युद्धवीरांचं शौर्य स्मारक उभारलं जाईल, अशी घोषणा मराठा शौर्य दिन कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी केली होती. या संबंधातला शासन आदेश काल जारी करण्यात आला. हरियाणा राज्यातल्या पानिपत इथल्या 'कालाआम' परिसरात हे स्मारक असेल, या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्यात येईल, मराठा शौर्याची गाथा सांगणारं संग्रहालय, दृकश्राव्य सादरीकरणही इथे असेल, अशी माहिती राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी काल दिली.
या प्रकल्पाकरता जमीन अधिग्रहित करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास विभाग, मध्यवर्ती यंत्रणा म्हणून काम करणार असून यासंदर्भात हरियाणा राज्य शासनाशी समन्वय साधण्यासाठी आपण स्वत: समन्वयक म्हणून काम करणार आहोत असं रावल म्हणाले.

**अमेरिका - नागरिकत्व**
अमेरिकेत जन्म झाल्यामुळे बालकांना मिळणाऱ्या नागरिकत्वाच्या हक्कावरील निर्बंध अंशत: लागू करण्यास परवानगी देण्याची विनंती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाला केली आहे. नव्या निर्बंधांनुसार, अमेरिकेत बेकायदेशीर रीत्या राहणाऱ्या लोकांच्या या वर्षीच्या 19 फेब्रुवारीनंतर जन्मलेल्या मुलांना अमेरिकेचं नागरिकत्व मिळणार नाही, असा नियम ट्रम्प प्रशासनानं आणला आहे. हा नियम आतापर्यंत काही राज्यांनीच लागू केला आहे.

**पॅरा-ॲथलेटिक्स**
नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक पॅरा-ॲथलेटिक्स स्पर्धांमध्ये भारतानं 134 पदकांसह अव्वल क्रमांक पटकावला. यामध्ये 45 सुवर्ण, 40 रौप्य आणि 49 कांस्य पदकांचा समावेश आहे. पुरुषांच्या गोळफेकीत भारतानं तीनही पदकं पटकावली. तर पुरुषांच्या 200 मीटर टी 35 गटात भारताच्या विनयनं रौप्य तर अभिषेक जाधवनं कांस्य पदक मिळवलं. महिलांच्या 200 मीटर टी 35 – टी 38 गटात भारताच्या प्रीती लाल हिनं कांस्य पदक मिळवलं. या स्पर्धेतलं प्रीतीचं हे दुसरं पदक आहे. तिनं 100 मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्य पदक पटकावलं आहे.

**बॅडमिंटन**
इंग्लंडमध्ये बर्मिंगहॅम इथं सुरू असलेल्या ऑल इंग्लंड ओपन चॅम्पियनशिप स्पर्धेत भारताच्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीनं महिला दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. त्यांनी दक्षिण कोरियाच्या काँग ही-योंग आणि किम हाय-जेओंग यांचा 15-21, 21-18, 21-18 असा पराभव केला. आज त्यांचं सामना चीनच्या टॅन निंग आणि लिऊ शेंगशु या जोडीशी होईल. लक्ष्य सेन यानंही पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यानं

गतविजेत्या इंडोनेशियाच्या जोनाथन क्रिस्टीचा 21-13, 21-10 असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत आता सेनची लढत चीनच्या ली शिफेंग याच्याशी होत आहे.

**हवामान**

पश्चिम भारतात आज उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. सौराष्ट्र, कच्छ, विदर्भ, छत्तीसगड राज्यात पारा चढलेला असेल, तर जम्मू काश्मीर, लडाख आणि अरुणाचल प्रदेशात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. ईशान्य भारतात अनेक ठिकाणी गारांच्या पावसाबरोबरच वादळाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**